# <u>प्रेस नोट</u>

ला.प्र.वि.,वाशिम.
दि.०८/०७/२०२४

१) श्री.राजेश विठ्ठलराव ठाकरे,वय ५७ वर्ष,पद ग्रामसेवक,ग्रामपंचाय आमगव्हान ता.मानोरा जि.वाशिम, २) देविदास उर्फ दयाराम चरणदास मेहळा (मेहल्डे) वय ६३ वर्ष,व्यवसाय मजुरी,(खाजगी ईसम तथा सरपंच यांचे सासरे),०३) सतिष देविदास मेहळा(मेहल्डे),वय ३१ वर्ष,व्यवसाय मजुरी (खाजगी ईसम तथा सरपंच पती),०४) देवेंद्र भिमराव कान्होडे वय ३९ वर्ष, व्यवसाय -शेती,उपसरपंच ग्राम आमगव्हाण ,यांना ३०,०००/- रुपयेची लाच स्विकारले प्रकरणात गुन्हा नोंद बाबत.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | १) श्री.राजेश विठ्ठलराव ठाकरे,वय ५७ वर्ष,पद ग्रामसेवक,ग्रामपंचाय आमगव्हान ता.मानोरा जि. वाशिम, २) देविदास उर्फ दयाराम चरणदास मेहळा (मेहल्डे) वय ६३ वर्ष,व्यवसाय मजुरी,(खाजगी ईसम तथा सरपंच यांचे सासरे),०३) सतिष देविदास मेहळा(मेहल्डे),वय ३१ वर्ष,व्यवसाय मजुरी (खाजगी ईसम तथा सरपंच पती),०४) देवेंद्र भिमराव कान्होडे वय ३९ वर्ष, व्यवसाय -शेती,उपसरपंच ग्राम आमगव्हाण |
| लाच मागणी रक्कम | ५०,०००/-रुपये, ३०,००० रु स्विकारुन उर्वरीत २०,००० रु काही वेळातच देण्यास सांगीतले. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३०,००००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | सतिष मेहल्डे यांची नमुना नं.१० पावती पुस्तकामध्ये कर वसुली करुन ग्रामपंचायतला जमा न करता परस्पर वसुली केल्या बाबतची तक्रार मागे घेउन, नमुना नं.१० पावती पुस्तका बाबतचे प्रकरण मिटवुन मदत करण्यासाठी |
| सापळा अधिकारी | बालाजी तिप्पलवाड लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

सतिष मेहल्डे यांची नमुना नं.१० पावती पुस्तकामध्ये कर वसुली करुन ग्रामपंचायतला जमा न करता परस्पर वसुली केल्या बाबतची तक्रार मागे घेउन, नमुना नं.१० पावती पुस्तका बाबतचे प्रकरण मिटवुन मदत करण्यासाठी ३०,०००/- रु. लाचेची मागणी केल्याची दि. ०५/०७/२०२४ रोजी तक्रार प्राप्त झाली.

दि. ०५/०७/२०२४ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक राजेश ठाकरे यांनी नमुना नं.१० पावती पुस्तका बाबतचे प्रकरण मिटवुन मदत करण्यासाठी ३०,०००/- रु. लाचेची मागणी केली व उपसरपंच देवेंद्र कान्होडे यांनी लाचेस मध्यस्ती करुन प्रोत्साहन दिले निष्पन्न झाले.

दि. ०८/०७/२०२४ रोजी सापळा कार्यवाहीचे आयोजन केले असता आरोपी देविदास मेहल्डे,सरपंच सासरे यांनी तकारदार यांचे कडंन ३०,००० रु लोचेची रक्कम स्विकारुन २०,००० रु ची अजुन मागणी केली. तसेच आरोपी सतिष मेहल्डे सरपंच पती यांनी स्वत: करीता लाचेची मागणी केली. आरोपी देवीदास मेहल्डे,सतिष मेहल्डे यांना रंगेहाथ पकडण्यात आले व आलोसे राजेश ठाकरे व उपसरपंच देवेंद्र कान्होडे यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन मानोरा जि. वाशिम येथे गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही चालु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. मारुती जगताप, अपर पोलीस अधिक्षक अनिल पवार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती यांचे मार्गदर्शनात पोलीस उपअधिक्षक गजानन आर शेळके,पो.नि.बालाजी तिप्पलवाड व अंमलदार सपोउपनि जाधव,पोहेकॉ,टवलारकर,मार्कंडि,अवगळे,आसीफ,पोना.मोघाड व चापोकॉ नावेद ला.प्र.वि. वाशिम यांनी केली आहे.

शासकीय लोकसेवकाने किंवा खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पो.नि.बालाजी तिप्पलवाड ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांनी केले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम दुरध्वनी क्रमांक- ०७२५२/२३५९३३
टोल फ्रि.नं.        - १०६४
बालाजी तिप्पलवाड-७०२०१५५३११

( बालाजी तिप्पलवाड )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम.